RNI NO - MHMAR/26/A2042

साप्ताहिक

महाविद्यालय खबरबात

MAHAVIDYALAY KHABARBAT

संस्थापक
मुख्य संपादक - डॉ. राजकुमार मा.कोल्हे

डोंबिवली,कल्याण,ठाणे,रायगड,नागपुर येथुन प्रकाशित

संपादक - डॉ.सौ.प्रेरणा राजकुमार मा.कोल्हे

■ वर्ष १ ■ अंक ४ ■ गुरुवार , ३० जुलै ते ६ ऑगस्ट २०२६ ■ किंमत ३ रुपये ■ पाने ४

जे एम एफ शिक्षण संस्थेत अवतरली संताची मांदियाळी...अवघी दुमदुमली पंढरी...









डोंबिवली (प्रतिनिधी) – देवशयनी एकादशी म्हणजेच आषाढी एकादशी, पंढरपूर मध्ये लाखो भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी दाखल झालेले असतानाच जन गण मन इंग्रजी माध्यमिक शाळा आणि विद्यामंदिर मध्ये देखील हजारोंच्या संख्येने विद्यार्थी,पालक उपस्थित राहून विठ्ठलाच्या नामघोषात दंग झाले.

जे एम एफ संस्थेचे अध्यक्ष डॉ.राजकुमार कोल्हे, सचिव डॉ प्रेरणा कोल्हे, खजिनदार जान्हवी कोल्हे यांचे जे एम एफ मंडपम मधे आगमन झाले , त्यांचे स्वागत करण्यासाठी सर्व बाल वारकरी विद्यार्थी एकत्र आले. मान्यवरांच्या हस्ते विठ्ठल रूक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व आरती करण्यात आली. बाल वारकऱ्यांनी तुळशीचे रोपटे देऊन मान्यवरांचे स्वागत केले.

विठ्ठल रुक्मिणी, संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, मुक्ताई, सोपानदेव, अशा अनेक संतांच्या वेशभूषा करून आलेले विद्यार्थी म्हणजे साक्षात संतांची मांदियाळी च अवतरली आहे असे भासत होते.ज्याप्रमाणे विठ्ठलाच्या हृदयात भक्ताचा वास आहे त्याच प्रमाणे आपल्या हृदयात देखील विठ्ठलाचा वास आहे पण त्यापेक्षाही माणुसकीचा ठेवा असणे अधिक गरजेचे आहे, आज लाखो वारकरी अनवाणी पायाने पंढरपूरला चालत जात आहेत त्यांची सेवा करणे किंवा जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले, तोची साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा.. .असे संत तुकाराम महाराजांनी सांगून ठेवले आहे ,त्याच भक्तीभावाने सेवा केली तर त्यांच्याच रूपाने विठ्ठल तुम्हाला तिथेच भेटणार आहे असे संस्थापक अध्यक्ष डॉ राजकुमार कोल्हे यांनी आपल्या भाषणात सांगितले तर अप्रतीम वेशभूषा करून आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना भेटवस्तू देखील दिल्या.

रोजच्या धावपळीच्या जीवनात आपण आपल्या स्वतःलाच विसरून जात आहोत, म्हणून स्वतःला शोधण्यासाठी अध्यात्माचा मार्ग हा सुलभ आहे, ज्याप्रमाणे भक्त पुंडलिकाने स्वतःला स्वतःमध्ये शोधून त्याच्या भक्तीने पांडुरंगाला प्रसन्न करून घेतले तसे तुम्ही देखील अंतर्मनात असलेल्या प्रश्नांना अध्यात्माच्या आधारे सोडवून त्या परमात्म्याला जवळ करा आणि आनंदी रहा असे सचिव डॉ प्रेरणा कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले आणि देवशयनी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थी दशेत असलेले बालरूप हे निरागस रूप असते, म्हणुनच आज विठ्ठल रुक्मीणी, साधू संतांच्या वेशभूषा मधे आलेले हे विद्यार्थी म्हणजे साक्षात पांडुरंग रुक्मिणचे अंशच दिसत आहेत असे खजिनदार जान्हवी कोल्हे यांनी आपल्या भाषणात म्हटले.संगीत शिक्षिका सौ श्रेया कुलकर्णी व विद्यार्थ्यांच्या तबल्याच्या साथीने सर्व विद्यार्थ्यांनी अभंग सादर केला तर सर्व शिक्षकांनी टाळ मृदुंगाच्या गजरात पावले थिरकली. दिंडी सोहळ्यामध्ये माऊलींची पालखी हे मोठे आकर्षण होते सर्व च जण उत्साहात ब्रह्मनादात सहभागी झाले होते. शिशु विहारच्या बालकांनी पांडुरंगाची गाणी गाऊन रिंगण सोहळा केला . याची देही याची डोळा पाहिला माऊलींचा सोहळा ..सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी भक्ती भावाने सेवा करून आषाढी एकादशीचा सोहळा पार पाडला तर नितेश मेस्त्री यांनी पांडुरंगाचे चित्र रेखाटन केले व नरेश पिसाट यांनी सजावट केली.अभिषेक देसाई, प्रमोद पगारे,सौ. मयुरी खोब्रागडे ,यांचे सहकार्य लाभते तर कार्यक्रमाचे फोटो व्हिडीओ काढण्याची ची जबाबदारी अखिल नायडू, जय लखारा, निखील शिंदे, तांडुलकर, त्यांच्या चमूने पार पाडली.

डॉ राजकुमार एम कोल्हे, संस्थापक अध्यक्ष व डॉ सौ प्रेरणा राजकुमार कोल्हे सचिव, जाह्नवीज मल्टि फाऊंडेशन तर्फे सर्व जे एम एफ परिवार ला

गुरु पूर्णिमा च्या हार्दिक शुभेच्छा ..

'यूजी ४.०' ऑनलाइन अभ्यासक्रमाची सक्ती अन्यायकारक; प्राध्यापकांमध्ये तीव्र असंतोष.....



मुंबई(प्रतिनिधी) – राज्यभरातील महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना 'महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था' अंतर्गत 'यूजी ४.०' ऑनलाइन अभ्यासक्रम पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. मात्र, ही सक्ती अत्यंत अन्यायकारक असल्याचा जाहीर आक्षेप अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ महाराष्ट्र प्रदेशने घेतला आहे. या संदर्भात महासंघाच्या वतीने डॉ. प्रदीप खेडकर यांनी उच्च शिक्षण संचालनालयाच्या संचालकांना निवेदन देऊन आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत.

उच्च शिक्षण विभागाने या अभ्यासक्रमासाठी प्रत्येक प्राध्यापकाकडून १००० रुपये शुल्क आकारणी सुरू केली आहे. तसेच महाविद्यालयांना १०० टक्के नोंदणी करण्याचे कडक निर्देश दिले आहेत. या आर्थिक भुर्दंडावर आणि सक्तीच्या धोरणावर महासंघाने तीव्र आक्षेप घेतला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ला पूर्ण पाठिंबा देत असतानाच, शिक्षकांचे हित आणि संस्थात्मक स्वायत्तता अबाधित राहिली पाहिजे, अशी आग्रही भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे.

केवळ इंग्रजी भाषेत उपलब्धता; प्राध्यापकांची अडचण....

हा संपूर्ण ऑनलाइन अभ्यासक्रम केवळ इंग्रजी भाषेत उपलब्ध करून देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील अनेक प्राध्यापक आणि कर्मचारी मराठी किंवा इतर प्रादेशिक भाषांमधून अध्यापन व प्रशासकीय कामकाज पाहतात. अशा वेळी भाषिक समावेशकतेचा विचार न करता केवळ इंग्रजीत अभ्यासक्रम लादणे चुकीचे आहे, असे महासंघाने म्हटले आहे. अभ्यासक्रमात वैधानिक सुसंगतता असावी आणि तो सर्वसमावेशक असावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

विद्यापीठात ऑगस्टमध्ये कंत्राटी पदभरती!

'एवढी' पदे भरली जाणार, सध्या १२८ कंत्राटी शिक्षक भरले.....



सोलापूर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात पुढील महिन्यात सुमारे १५० कंत्राटी पदांची भरती होणार आहे. त्यासाठी विद्यापीठाने नव्या सेवा पुरवठादारासाठी निविदा मागविली असून, त्याची निवड झाल्यानंतर ही पदभरती केली जाणार आहे.

सोलापूर विद्यापीठातील परीक्षा, आस्थापना, वित्त, शिक्षक मान्यता विभागांसह ११ संकुलांमध्ये दरवर्षी ११ महिन्यांसाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. यात शिपाई व लिपिक आदी पदांचा समावेश असतो. २०२५-२६ या वर्षासाठी नियुक्त करण्यात आलेल्या सेवा पुरवठादाराची मुदत संपल्याने नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

शिपाई व लिपिक पदांसाठी चांगले मानधन मिळत असल्याने पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतलेले उमेदवारही अर्ज करतात. अर्जदारांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड केली जाते. सध्या पूर्वी नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्यात आले असून, पुढील दहा दिवसांत सेवा पुरवठादाराची निवड होण्याची शक्यता आहे. त्यानंतर विभागांच्या गरजेनुसार कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाणार आहे.

१२८ कंत्राटी शिक्षकांचीही निवड.....

विद्यापीठातील ११ संकुलांमध्ये सुमारे पाच हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांच्या अध्यापनासाठी १२८ कंत्राटी शिक्षकांच्या मुलाखती घेऊन पहिली गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. १५ दिवसांनंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची निवड करून दुसरी गुणवत्ता यादी जाहीर केली जाणार आहे. या शिक्षकांना दरमहा २५ ते ३० हजार रुपयांपर्यंत मानधन मिळणार आहे.

संपादकीय

पेपर लीक-परिणाम आणि उपाय

पेपर लीकचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम आणि त्यावरील उपाय -आता **NEET** परीक्षेच्या लीक चा विषय खूपच ताजा आहे. आणि सगळ्या न्यूज चैनल वर फक्त पेपर लीक आणि त्यामुळे होणारा हंगामा एवढाच न्यूज सुरू आहेत पण त्याचा विद्यार्थ्यांवर खूपच विपरित परिणाम होत आहे. त्याचा राजनीतिक फायदा उचलण्यासाठी खूपच अनैतिक गोष्टी केल्या जात आहेत. शिक्षण ही व्यक्ती आणि राष्ट्राच्या विकासाची गुरुकिल्ली आहे. परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचे आणि कौशल्याचे मूल्यमापन करण्याची प्रक्रिया आहे. परंतु पेपर लीकच्या घटना वाढल्यामुळे या प्रक्रियेची विश्वासार्हता धोक्यात येत आहे. याचा सर्वाधिक फटका प्रामाणिक विद्यार्थ्यांना बसतो. पेपर लीकचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम मानसिक ताण आणि नैराश्य वाढते - वर्षभर प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना अन्याय झाल्याची भावना निर्माण होते. प्रामाणिकपणावरील विश्वास कमी होतो - मेहनत करूनही योग्य न्याय मिळत नाही, अशी भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होऊ शकते. वेळ आणि आर्थिक नुकसान - परीक्षा रद्द झाल्यास पुन्हा तयारी, प्रवास आणि इतर खर्च करावा लागतो. करिअरला विलंब होतो - प्रवेश प्रक्रिया, नोकरी आणि पुढील शिक्षण उशिरा सुरू होते. शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होतो - परीक्षा प्रक्रियेच्या पारदर्शकतेबद्दल शंका निर्माण होते. अनैतिक मार्गांना प्रोत्साहन मिळू शकते - काही विद्यार्थ्यांना चुकीच्या मार्गान यश मिळवण्याची प्रेरणा मिळण्याचा धोका असतो. पेपर लीक रोखण्यासाठी उपाय..... प्रश्नपत्रिका तयार करणे, छपाई आणि वितरणासाठी अत्याधुनिक डिजिटल सुरक्षा व्यवस्था वापरणे. प्रश्नपत्रिकेची गुप्तता राखण्यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर देखरेख ठेवणे. पेपर लीक करणाऱ्या व्यक्ती आणि संबंधितांना कठोर कायदेशीर शिक्षा देणे. परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही, बायोमेट्रिक पडताळणी आणि मजबूत निरीक्षण व्यवस्था लागू करणे. प्रश्नपत्रिका शेवटच्या क्षणी सुरक्षित डिजिटल पद्धतीने उपलब्ध करून देण्याचा विचार करणे. विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणा, नैतिक मूल्ये आणि परीक्षेतील सचोटी याबाबत जनजागृती करणे. पेपर लीक झाल्यास तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करणे आणि विद्यार्थ्यांना पारदर्शक माहिती देणे. निष्कर्ष..... पेपर लीक ही विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर आणि देशाच्या शिक्षण व्यवस्थेवर आघात करणारी गंभीर समस्या आहे. सरकार, परीक्षा मंडळे, शैक्षणिक संस्था, पालक आणि समाज यांनी एकत्रितपणे कठोर उपाययोजना केल्यास ही समस्या मोठ्या प्रमाणात कमी करता येईल. प्रत्येक विद्यार्थ्याला न्याय्य, पारदर्शक आणि विश्वासार्ह परीक्षा व्यवस्था मिळणे हीच खरी शिक्षण व्यवस्थेची ओळख आहे. परंतु आता मात्र या शिक्षणाच्या पायावरच वारंवार आघात केला जात आहे. ज्यामुळे विद्यार्थी फारच निराश होत आहे. चर्चा करून मुद्दे सोडवू शकत असले तरी विद्यार्थी मात्र फारच विचलित झाले आहेत. आणि हिंसेचा मार्ग स्विकारताना दिसत आहेत. म्हणुन या समस्येवर लवकरच तोडगा काढणे अत्यंत महत्वपूर्ण आहे.

डॉ. प्रेरणा राजकुमार कोल्हे
संपादक

राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासाठी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना

'वैयक्तिक अल्पसंख्याक प्रमाणपत्रा'ची अट नाही

शाळा सोडल्याचा दाखला, धर्मप्रमुखाचे प्रमाणपत्र किंवा पालकांचे शपथपत्र प्रवेशासाठी ग्राह्य धरण्याचे प्रशासनाचे स्पष्ट निर्देश,प्रमाणपत्राअभावी कोणताही पात्र विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्याचे शिक्षण संचालनालयांना निर्देश

मुंबई, दि. २९ : राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेताना अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना वैयक्तिक अल्पसंख्याक प्रमाणपत्राची/ दाखल्याची सक्ती केली जाऊ नये, असे स्पष्ट निर्देश महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाने दिले आहेत. शासन निर्णयानुसार विहित केलेले पुरावे ग्राह्य धरून विद्यार्थ्यांना तात्काळ प्रवेश देण्याचे आवाहन विभागाने केले आहे. महाराष्ट्र शासनाने मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, झोराष्ट्रीयन (पारसी), जैन आणि ज्यु या ७ लोकसमूहांना 'अल्पसंख्याक लोकसमूह' म्हणून घोषित केले आहे. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार राज्य शासनाकडून धार्मिक अथवा भाषिक अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तींना वैयक्तिक स्तरावर कोणतेही वेगळे अल्पसंख्याक प्रमाणपत्र किंवा दाखला दिला जात नाही. सध्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची प्रवेश प्रक्रिया सुरू असताना, काही शैक्षणिक संस्थांकडून विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक अल्पसंख्याक प्रमाणपत्राची मागणी केली जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

या पार्श्वभूमीवर अल्पसंख्याक विकास विभागाने स्पष्ट केले आहे की, १ जुलै २०१३ च्या शासन निर्णयानुसार खालीलपैकी कोणताही एक पुरावा अल्पसंख्याक असल्याचा वैध पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात यावा.





जन गण मन विद्यामंदिर आणि जनगणमन सेकंडरी स्कूल अत्यंत लक्ष देऊन सांभाळणारा आमचा स्टाफ.



वंदे मातरम कॉलेजमधील कर्मचारी वर्ग



जनगणमन मुलांसाठी प्ले ग्रुप आणि प्रायमरी व सी बी एस सी आणि स्टेट बोर्ड मधील कर्मचारी वर्ग.









जानवी मल्टी फाउंडेशनचा कर्मचारी वर्ग म्हणजे आमचे कुटुंबच

जीवनाचे महत्त्व

जीवन ही देवाने दिलेली सर्वात मोठी आणि अनमोल भेट आहे. ही भेट आपल्याला फक्त एकदाच मिळते. म्हणून प्रत्येक श्वासाचे, प्रत्येक दिवसाचे मोल समजून घेणे गरजेचे आहे.

१. शिकण्यासाठी जीवन

जीवन म्हणजे एक मोठी शाळा आहे. इथे आपण प्रत्येक पडण्यातून शिकतो, प्रत्येक अपयशातून घडतो. लहानपणापासून म्हातारपणापर्यंत आपण काही ना काही नवीन शिकतच असतो. ज्ञान, अनुभव आणि संस्कार यामुळे आपले जीवन समृद्ध होते.

२. नात्यांसाठी जीवन

जीवनाला खरा अर्थ आई-वडील, मित्र, शिक्षक आणि समाजामुळे मिळतो. नाती जपल्याने एकटेपणा दूर होतो. दुसऱ्याला मदत करणे, त्याच्या दुःखात सोबत उभे राहणे हेच खरे जीवन आहे. माणुसकी हाच जीवनाचा पाया आहे.

३. ध्येयासाठी जीवन

प्रत्येकाला आयुष्यात काहीतरी ध्येय हवे. ध्येय नसलेले जीवन म्हणजे दिशाहीन होडीसारखे. मेहनत, चिकाटी आणि सकारात्मक विचार ठेवले तर कोणतेही स्वप्न अशक्य नाही. अपयश आले तरी थांबायचे नाही, कारण अपयश हेच यशाची पहिली पायरी आहे.

तेजावती कोटीयन
प्रभारी प्राचार्य
जन गण मन विद्यामंदिर

४. मन:शांतीसाठी आरोग्य आणि जीवन

शरीर आणि मन दोन्ही निरोगी असतील तरच जीवनाचा आनंद घेता येतो. योग, व्यायाम, चांगला आहार आणि पुरेशी झोप यामुळे आपण तणावमुक्त राहतो. रोज 10 मिनिटे स्वतःसाठी काढणे, ध्यान करणे म्हणजे स्वतःला पुन्हा चार्ज करणे आहे.

५. समाजासाठी जीवन

आपण एकटे जगू शकत नाही. झाडे लावणे, गरजूला मदत करणे, स्वच्छता ठेवणे या छोट्या गोष्टींनी समाज सुंदर होतो. दिल्याने कमी होत नाही, तर वाढते.

शेवटी, जीवन ही संधी आहे. रडण्यात घालवण्यापेक्षा हसून जगा. चुका होतील, पण त्यातून सावरून पुन्हा उभे राहा. कारण उद्याची सकाळ नवीन आशा घेऊन येते.

जगा आणि जगू द्या हाच जीवनाचा खरा मंत्र आहे. प्रत्येक दिवस शेवटचा आहे असे समजून चांगले कर्म करा, कारण आयुष्य खूप सुंदर आहे.

ओसाड महाविद्यालये; बकाल उच्च शिक्षण व्यवस्था....



मुंबई (प्रतिनिधी) – महाराष्ट्रातील पारंपरिक वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये ३० ते ४० टक्के प्रवेश घटले असून कला आणि वाणिज्य शाखांच्या तुकड्या बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. मुक्त विद्यापीठांची वाढती पसंती, महागडे खासगी शिक्षण, बेरोजगारीची भीती आणि अद्ययावत अभ्यासक्रमांचा अभाव यामुळे उच्च शिक्षण व्यवस्था ओस पडत चालली आहे.

परदेशी विद्यापीठे शिक्षणावरील खर्चाकडे गुंतवणूक म्हणून पाहत आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सेक्युरिटी, क्वांटम कॉम्प्युटिंग, मशीन लर्निंग यांसारखे अद्ययावत शिक्षण देण्यासाठी धडपडतात; परंतु आम्ही मात्र इंडियन नॉलेज सिस्टीमच्या नावाखाली दोन हजार वर्षे मागे जाण्याचे उद्दिष्ट घेऊन २१व्या शतकात वाटचाल करीत आहोत.

एके काळी जुनी प्राध्यापक मंडळी, 'आम्ही एकेक विद्यार्थी गोळा करून मोठ्या कष्टाने महाविद्यालय उभे केले', हे नवीन प्राध्यापकांना ऐकवीत तेव्हा ते मान्य करणे कठीण जाई; परंतु आज उभे राहिलेले विद्यार्थी प्रवेश संकट पाहता त्यातील सत्यता पटू लागली आहे. आता एकेका प्रवेशासाठी प्रयत्न करावा लागत आहे. प्रतिवर्षी त्याची तीव्रता वाढत चालली आहे. ज्या महाविद्यालयांना दोन किंवा तीन अनुदानित तुकड्यांची मान्यता आहे, तेथे मोठ्या मुश्किलीने एक तुकडीदेखील पूर्ण होऊ शकत नाही. असे का झाले? महाविद्यालये ओस का पडायला लागली?

ऑल इंडिया सर्वे ऑन हायर एज्युकेशनच्या २०२१-२२ च्या अहवालानुसार देशात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण केवळ ४.३३ कोटी असून त्यात २.७ कोटी महिला आहेत. हाच अहवाल असे सांगतो की, उच्च शिक्षणात अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांचे प्रमाण ६८.३३ लाख तर अनुसूचित जमातींचे २७.१ लाख असून या जातीतील महिलांचे उच्च शिक्षणातील प्रमाण पुरुषांच्या तुलनेत अध्यार्पेक्षा कमी आहे. ओबीसी आणि अल्पसंख्याकांचीही तीच अवस्था आहे.

१.६३ कोटी ओबीसी पुरुष तर ३०.१ लाख अल्पसंख्याक पुरुष विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत, तर महिलांचे उच्च शिक्षणातील प्रमाण ओबीसीमध्ये ७३.१९ लाख तर अल्पसंख्याकांमध्ये १५.२ लाख आढळले आहे. याचाच अर्थ असा की, भारतातील जातिव्यवस्था, आर्थिक वर्ग आणि लिंगभाव यांसारख्या घटकांवर आधारित सामाजिक स्तरीकरण महाविद्यालयाच्या प्रवेश प्रक्रियेवर मोठा विपरीत प्रभाव पाडते.

तब्बल ७२ अध्यापकांच्या सेवा अहिल्यानगरला वर्ग



विदर्भातील नव्या मेडिकल कॉलेजकडे दुर्लक्ष.....

नागपूर : राज्यात नव्याने सुरु झालेल्या शासकीय वैद्यकीयमहाविद्यालयांमध्ये अध्यापकांची मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे कायम असताना वैद्यकीय शिक्षण विभागाने मात्र केवळ नवनिर्मित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अहिल्यानगर येथे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या निकषांची पूर्तता करण्यासाठी अवघ्या महिनाभरात तब्बल ७२ अध्यापकांचे सेवावर्ग केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. विदर्भातील अमरावती, वाशिम, बुलढाणा, वर्धा (हिंगणघाट), भंडारा आणि गडचिरोलीसह इतर नव्या मेडिकल कॉलेजांमध्ये अध्यापकांचा गंभीर तुटवडा कायम असतानाही शासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.

अहिल्यानगर येथे १०० विद्यार्थ्यांच्या प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यास २३ मे २०२५ रोजी शासनाने मान्यता दिली. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून एमबीबीएस अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी आवश्यक फॅकल्टी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्यभरातील विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील अध्यापकांचे मोठ्या प्रमाणावर सेवावर्ग करण्यात आले आहेत. वैद्यकीय शिक्षण विभागाने १० जून २०२६ रोजी काढलेल्या आदेशानुसार ५१ अध्यापकांचे अहिल्यानगर येथे सेवावर्ग करण्यात आले. यामध्ये १४ प्राध्यापक, १३ सहयोगी प्राध्यापक आणि २४ सहायक प्राध्यापकांचा समावेश आहे. हे अध्यापक नागपूर, मिरज, अलिबाग, छत्रपती संभाजीनगर, पुणे, सोलापूर, सातारा, अंबाजोगाई, लातूर, वाशिम, बारामती, परभणी, जळगाव, कोल्हापूर आदी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतून हलविण्यात आले.

२१ अध्यापकांचे सेवावर्ग महिन्याभरातच

यानंतर अवघ्या एका महिन्यात ९ जुलै २०२६ रोजी पुन्हा आदेश काढून आणखी २१ अध्यापकांचे सेवावर्ग करण्यात आले. यामध्ये ३ प्राध्यापक, ६ सहयोगी प्राध्यापक आणि उर्वरित १२ सहायक प्राध्यापकांचा समावेश आहे.

जुन्नरच्या अण्णासाहेब आवटे विद्यामंदिरातील चार विद्यार्थ्यांना

केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालयाची शिष्यवृत्ती.....



जुन्नर (प्रतिनिधी) – जुन्नर येथील श्री शिवाजी मराठा शिक्षण संस्थेच्या अण्णासाहेब आवटे विद्यामंदिरातील चार विद्यार्थ्यांना भारत सरकारच्या केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालयाच्या वतीने संस्कृत विषयातील प्राविण्याबाबत शिष्यवृत्ती जाहीर झाली असल्याची माहिती मुख्याध्यापिका संगीता बारवे यांना जाहीर झाली.

या शिष्यवृत्तीसाठी तेजश्री भोरू चिमटे, अनुष्का गणेश रोकडे, सार्थक जगदीश सराईकर, प्रेरणा कैलास मुठे या विद्यार्थ्यांची निवड झाली. या विद्यार्थ्यांना इयत्ता बारावीपर्यंतचे शिक्षण घेत असताना दरवर्षी पाच हजार रुपये इतकी शिष्यवृत्ती मिळणार आहे. या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यासाठी शिक्षिका प्रियंका वर्पे यांनी मार्गदर्शन व प्रयत्न केले.

यावेळी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा व मार्गदर्शक शिक्षक प्रियांका वर्पे यांचा संस्थेचे अध्यक्ष डॉ विलास चव्हाण, उपाध्यक्ष देवेंद्र खिलारी, खजिनदार सुनील ढोबळे, सेक्रेटरी अविनाश पुंडे, संचालक विलास पानसरे, अँड.अरूण काळे, सुभाषराव कवडे, रवींद्र पानसरे, मच्छिंद्र कबाडी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

पुणे जिल्ह्यातील महाविद्यालयीन अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदांच्या निवडणुका नुकत्याच पार.....



पुणे (प्रतिनिधी) – पुणे जिल्ह्यातील महाविद्यालयीन अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदांच्या निवडी नुकत्याच पार पडल्या. पहिल्या टप्प्यात बारामती, भोर, पुरंदर, इंदापूर आणि दौंड या तालुक्यांतील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी निवड प्रक्रियेत सहभाग नोंदवला. महाविद्यालयांमध्ये निवडणूक होणार असल्याने उमेदवारांनी जिद्दीने प्रचार केला होता. त्यामुळे कोण निवडून येणार याबाबत उत्कंठा होती. मात्र प्रतिस्पर्धी उमेदवारांनी सामंजस्याने सवार्नुमते बिनविरोध विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यानंतर सर्व महाविद्यालयीन अध्यक्षांची सकाळच्या कार्यालयात विधानसभा-निहाय सामान्य ज्ञानावर लेखी परीक्षा घेण्यात आली. सर्वाधिक गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची 'प्रतिनिधी विधानसभा सदस्य' पदासाठी निवड करण्यात आली. महाविद्यालयीन स्तरावर प्रतिनिधी क्लबची स्थापना झाल्यानंतर उद्घाटन कार्यक्रमात विद्यार्थ्यांना निवडीची पत्रे देण्यात येणार आहेत. तसेच उर्वरित तालुक्यांतील निवडी पूर्ण झाल्यानंतर जिल्हास्तरीय अधिवेशन आयोजित करण्यात येणार आहे. 'प्रतिनिधी विधानसभा सदस्य' म्हणून निवड झालेले विद्यार्थी यिन क्लबच्या माध्यमातून प्रशासनाचा जवळून अभ्यास करणार आहेत. त्यासाठी ते तालुक्याचे तहसीलदार, पोलिस उपअधीक्षक, बीडीओ तसेच स्थानिक आमदार यांची भेट घेणार आहेत. पहिल्या सहा महिन्यांत सामाजिक आणि शैक्षणिक कामांचा अजेंडा तयार करून तो पूर्ण करण्यावर भर दिला जाणार आहे.

विद्यार्थ्यांसाठी मोठा दिलासा ! प्रलंबित सर्व निकाल 31 जुलैपर्यंत जाहीर



मुंबई (प्रतिनिधी) – महाराष्ट्र सरकारने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याला गती देणारा महत्वाचा निर्णय घेतला आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने राज्यातील सर्व सार्वजनिक (Maharashtra Public University Result)अकृषी विद्यापीठे आणि त्यांच्या संलग्न महाविद्यालयांना ३१ जुलैपर्यंत सर्व प्रलंबित परीक्षा निकाल(Pending exam results announced)जाहीर करण्याचे सक्त निर्देश दिले आहेत. निकालांच्या सातत्याने होणाऱ्या विलंबामुळे (Pending exam results announced) लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याची गंभीर दखल घेत विभागाने ही कठोर भूमिका घेतली आहे. कोणत्याही परिस्थितीत ही मुदत पाळली जावी, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांचेमार्गदर्शन...

गेल्या काही महिन्यांपासून पदवी, पदव्युत्तर आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या निकालांमध्ये मोठा विलंब होत असल्याच्या तक्रार विद्यार्थ्यांकडून सातत्याने येत होत्या. अनेक विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती अर्ज, स्पर्धा परीक्षा, सरकारी-खासगी नोकऱ्यांसाठी अर्ज आणि परदेशातील विद्यापीठांमध्ये प्रवेश घेणे अशक्य झाले होते. वेळेवर गुणपत्रिका न मिळाल्याने त्यांचे संपूर्ण शैक्षणिक नियोजन विस्कळीत झाले होते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठी नाराजी निर्माण झाली होती. यापूर्वी विभागाने विद्यापीठांना वेळेत निकाल जाहीर करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. मात्र, काही विद्यापीठांकडून या सूचनांची प्रभावी अंमलबजावणी न झाल्याने विभागाने यावेळी अधिक कठोर पाऊले उचलली आहेत.शैक्षणिक वर्ष सुरळीत चालण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी सरकारने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह आहे. आता सर्व विद्यापीठे दिलेल्या मुदतीत निकाल प्रसिद्ध करतील की नाही, याकडे संपूर्ण विद्यार्थी वर्गाचे लक्ष लागले आहे. यशस्वी अंमलबजावणीद्वारे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

आयआयटी मुंबईवर अनुदानाचा वर्षाव;

नंदन निलेकणी यांच्यानंतर स्टेट बॅंकेची मोठी घोषणा....



मुंबई (प्रतिनिधी) – इन्फोसिस'चे (Infosis)सहसंचालक नंदन निलेकणी यांनी IIT मुंबईला नुकतेच ३१५ कोटी रुपयांचे अनुदान दिले होते. त्यानंतर आता स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) फाउंडेशनही सरसावली आहे. फाऊंडेशनने IIT मुंबईला २२.५ कोटी रुपयांचे अनुदान देण्याची घोषणा केली आहे. बँकेच्या ६८ व्या वर्धापन दिनानिमित्त बँकेचे अध्यक्ष दिनेश खारा यांनी ही घोषणा केली.

IIT बॉम्बे येथे बँकिंग डेटा आणि विश्लेषण केंद्र स्थापन करण्यासाठी हा अनुदान देण्यात येत असल्याचे खारा यांनी सांगितले. या केंद्रात १० हजार चौरस फूट प्रयोगशाळा स्थापन करण्यात येणार आहे. तसेच डेटा विश्लेषण आणि अक संशोधन आणि कौशल्य विकासासाठी आवश्यक उपक्रम या ठिकाणी राबविण्यात येणार आहेत.

भारतीय बँकिंग आणि वित्तीय सेवा क्षेत्रासमोरील आव्हानांवर तोडगा काढणे, हे या केंद्राचे प्रमुख उद्देश असणार आहे. एसबीआयच्या बँकिंगमधील व्यापक अनुभवाचा आणि IIT बॉम्बेच्या संशोधन कौशल्याचा लाभ हे या उपक्रमा मागचे महत्वाचे उद्देश आहे, असे खारा यांनी सांगितले.

SPPU विद्यापीठात तीन लाखात बीकॉमची डिग्री?

वित्त व लेखा विभागातील अधिकाऱ्याचा प्रताप.....



पुणे (प्रतिनिधी) – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील वित्त व लेखा विभागातील एका अधिकाऱ्याने रिक्षाचालकाच्या मुलाला तीन लाखात बनावट बीकॉम ची डिग्री दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी विद्यापीठ प्रशासनाने विभागाअंतर्गत चौकशी समिती स्थापन केले असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई केली जाणार आहे. संबंधित डिग्री मध्ये गोंधळ असल्याचे निदर्शनास आल्यानंतर रिक्षाचालक तक्रार घेऊन समोर आला आहे.

ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वेगवेगळ्या कारणांमुळे चर्चेत आहे. त्यात आता एका रिक्षा चालकाच्या मुलाला बनावट डिग्री दिल्याचा प्रकार समोर आला आहे. वित्त व लेखा विभागातील सहाय्यक कक्षाधिकारी रमेश मुखेकर यांच्या विरोधात संबंधित रिक्षा चालकाने तक्रार दिली आहे.

मुक्त विद्यापीठाची ऑनलाईन डिग्री प्रस्थापित करणार

डॉ.संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.....



मुंबई (प्रतिनिधी) – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या (Yashwantrao Chavan Maharashtra Open University) माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी पुढील काळात आवश्यक शैक्षणिक व प्रशासकीय बदल केले जातील.तसेच मुक्त विद्यापीठाची ऑनलाईन डिग्री प्रस्थापित (ycmou online degree) केली जाईल. विद्यापीठाच्या केंद्रांचे (YCMOU center) सक्षमीकरण करण्यासाठी व त्यांच्या कामात सुसूत्रता आणण्यासाठी आढावा घेऊन आवश्यक कार्यवाही केली करण्यात येईल,असे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे नवनियुक्त कुलगुरू डॉ.संजीव सोनवणे यांनी 'एज्यूवार्ता' शी संवाद साधतांना सांगितले.

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण दर्जेदार शिक्षणावर भर -मंत्री दादाजी भुसे



मुंबई, दि. २९ :शालेय शिक्षण विभागांतर्गत कार्यरत जवाहर नवोदय विद्यालय, केंद्रीय विद्यालय, सैनिकी शाळा, शासकीय विद्यानिकेतन आणि कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय या शाळांमधून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण दजेर्दार शिक्षणावर अधिक भर देण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले. या अनुषंगाने या शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे, सोयी सुविधा, विद्यार्थ्यांची प्रवेश स्थिती अभ्यासाचे मूल्यमापन याबाबत त्यांनी मंत्रालयात मंगळवारी आयोजित बैठकीत सविस्तर आढावा घेतला.

शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संचालक, विभागातील वरिष्ठ अधिकारी; तसेच संबंधित संस्थांचे प्राचार्य आणि कार्यालय प्रमुख यावेळी उपस्थित होते.

शिक्षक, अधिकारी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मंजूर, कार्यरत व रिक्त पदांचा यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला. याचबरोबर विविध संस्थांच्या इमारतींची सद्यस्थिती, शासनाकडून मंजूर झालेल्या अनुदानाचा वापर, खर्च व शिल्लक निधी, विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची सद्यस्थिती, अभ्यासक्रमाची अंमलबजावणी, मूल्यमापन प्रक्रिया तसेच विविध योजनांच्या प्रगतीचा मंत्री दादाजी भुसे यांनी सविस्तर आढावा घेतला.

पुणे विद्यापीठात बनावट बी.कॉम. पदवीप्रकरण तापले;



विद्यार्थ्यांचे तीव्र आंदोलन....

पुणे (प्रतिनिधी) – (Pune University fake B.Com degree) पदव्या घोटाळ्याने एकच खळबळ उडवली आहे. नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया (एनएसयूआय), अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप), विद्यापीठ विद्यार्थी संघर्ष कृती समिती व अन्य विद्यार्थी संघटनांनी एकत्रित येऊन विद्यापीठ प्रशासनावर जोरदार हल्लाबोल केला. विद्यार्थ्यांनी प्रशासनाला धारेवर धरत संबंधित कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी (Pune University employees demand action) केली. या प्रकरणात गुणवंत विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खिलवाड होत असल्याचे मत व्यक्त करत आंदोलकांनी (Pune University Student Movement) प्रशासनाकडून स्पष्ट उत्तरांची मागणी केली.

आंदोलनादरम्यान विद्यार्थी संघटनांनी अनेक महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. यामध्ये प्रकरणातील सर्व दोषींवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, प्रभारी कुलसचिवांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालकांनी तात्काळ राजीनामा द्यावा, तसेच वित्त व लेखा विभागातील मुख्य कर्मचारी व विभागप्रमुखांवर कारवाई करून स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने दोषींवर त्वरित कारवाई केली नाही तर विद्यार्थीहित रक्षणासाठी आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशाराही देण्यात आला. या आंदोलनात पुणे जिल्हा व शहर एनएसयूआयचे अध्यक्ष अभिजित गोरे यांच्यासह संघटनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

हे साप्ताहिक मालक,मुद्रक,प्रकाशक,डॉ.राजकुमार मा.कोल्हे यांनी जागृती प्रिटींग प्रेस,बी-१०१,भायखळा सर्विस इंडस्ट्रीयल इस्टेट,डी.के.क्रॉस रोड,भायखळा,मुंबई-४०००२७.येथे छापून ५०१,गोपी मॉल रेसिडेन्स,एनएसएस रोड,डोंबिवली (प.),ठाणे,महाराष्ट्र - ४२१२०२.येथुन प्रकाशित केले.संपादक : डॉ.सौ.प्रेरणा राजकुमार कोल्हे,
भ्रमणध्वनी :८४५२००५१९८/९२२१४३७४१४ ईमेल : RNI No.: MHMAR/26/A2042

Printed,Published And Owned By.**Dr.Rajkumar M.kolhe** Printed At Jagruti Printg Press,b-101,byculla Service Industrial Estate,D.K.Cross Road, Byculla,Mumbai-400027,andPublished From 501,Gopi Cine Mall Residence,NSS Road, Dombivli West, Thane, Maharashtra.**- 421202**
Editor : Dr.Mrs.Prerna R.Kolhe,Mobile : 8452005198,Email :www.mahavidyalaykhabarbat.in, RNI No.:- MHMAR/26/A2042